# मी पाहिले आनंदवन
# माझे आचंबिले मन!

श्री. केशव नारायण महाजन
शुभार्थी



**श्री. केशव नारायण महाजन**
**सौ. अंजली महाजन**

**श्री. केशव महाजन (शुभार्थी) व सौ. अंजली महाजन (शुभंकर) हे एक आनंदी जोडपे आहे. श्री. महाजनांना पार्किन्सन्समुळे निवृत्ती स्विकारावी लागली. ते सिनेमाचे अत्यंत शौकीन आहेत. कित्येक सिनेमातील गाणी व संवाद (डायलॉग) त्यांना मुखोद्गत आहेत. मंडळाच्या अनेक कार्यक्रमात त्यांनी आपली ही कला दाखवून लोकांची प्रशंसा संपादन केली आहे.**

**सौ. अंजली महाजन या मुख्याध्यापिका म्हणून नोकरी करीत होत्या. घरी पार्किन्सन्सग्रस्त पती व शंभरी गाठलेल्या वृद्ध सासूबाई. तशात मुली सासरी गेलेल्या. त्यामुळे घरात कोणाची मदतही नाही. अशा परिस्थितीत त्या तारेवरची कसरत करत सर्व सांभाळत होत्या. सर्व गोष्टींचा विचार करून त्यांनी नोकरीवरून स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली. त्यामुळे पती, सासूबाई व तया स्वत:पण पूर्ण सुखी आहेत. तसेच पार्किन्सन्स मित्रमंडळाच्या कामातही त्या उत्साहाने भाग घेत असतात. अशा हरहुन्नरी अंजलीताईंचा उत्साह वाढतच राहो.**

एके दिवशी खणखणला फोन! मी वदलो. हॅलो बोलतंय कोण?

मी तिर्थळी मॅडम्! येताय काय आनंदवनात?

आणि काय सांगू? आम्ही उभयता महाजन तत्काळ तयार झालो .

२ जानेवारी २०१३ ते ८ जानेवारी २०१३ या कालावधीत आम्ही पार्किन्सन्स सपोर्ट ग्रुपबरोबर आनंदवन, हेमलकसा, सोमनाथ हे प्रकल्प पाहण्यासाठी गेलो. पुणे ते नागपूर हा प्रवास रेल्वेने (येता-जाता) केला व तेथील अंतर्गत प्रवास बसने केला; परंतु प्रवासात कोणालाही कसलाही त्रास झाला नाही, कुठेही थकवा जाणवला नाही किंवा कोणताही प्रवास कंटाळवाणा झाला नाही. प्रवास करणाऱ्यांपैकी काही प्रवासी PD हे पेशंट आहेत हे कोणाला सांगूनही खरे वाटले नसते इतके सर्वजण आनंदी व उत्साही होणे. प्रत्येकजण एकमेकांना सहकार्य करीत होते. एकमेकांची योग्य ती काळजी घेत होते. आपापली औषधे वेळेवर घेण्याचे काम जो तो करीत होतो; त्यामुळे खूप छान वाटत होते.

आनंदवन, हेमलकसा व सोमनाथ या तीनही प्रकल्पांचे काम अतिशय उत्तम व वाखाणण्याजोगे आहे त्यात तिळमात्र शंका नाही; परंतु मला यापैकी आनंदवन हे स्थळ फार भावले. आनंदवन पाहून मला निखळ आनंद तर मिळालाच, पण महद्आश्चर्य वाटले व त्यामुळे मी माझा आजार पार विसरून गेलो.

६३ वर्षांपूर्वी आगळ्या-वेगळ्या मानवी प्रेरणेतून बाबा आमटे यांनी आनंदवनाची निर्मिती केली व तिकडे काश्मीरमध्ये विश्वनिर्मात्याने नंदनवनाची निर्मिती केली, पण तरी ही भारताच्या त्या नंदनवनापेक्षा मला आनंदवन फार भावले. कुष्ठरुग्णांच्या पुनर्वसन प्रकल्पाला बाबांनी 'आनंदवन' असे जे काव्यमय नाव दिले आहे ते अतिशय समर्पक असेच आहे. त्यावरून बाबांची प्रतिभाशक्ती किती अफाट होती. ह्याची प्रचिती मला त्या क्षणी आली.

बाबांच्या ठायी असलेला दुर्दम्य आशावाद व उदंड उर्जा व ऊर्जेच्या बळावरच त्यांनी कुष्ठरुग्णांच्या मनात आत्मसन्मानाची प्रेरणा आणि अन्य पीडितांविषयीची करुणा जागवली. त्यामुळेच कुष्ठरुग्णांनी स्वतःचे पुनर्वसन झाल्यानंतर अंध, अपंग, मूकबधिर, अनाथ, निराधार, वृद्ध, अन्यायग्रस्त, आदिवासी वगैरे पीडितांना निरपेक्ष वृत्तीने मदतीचा खरा हात दिला.

एवढ्या मोठ्या कार्याचा डोलारा बाबांनी घालून दिलेल्या स्वावलंबनाच्या पायंड्यावर आधारलेला आहे हे पाहून मला फार फार आश्चर्य वाटले. आनंदवनात ४० उद्योग व्यवसायांतून हजारो वस्तू आणि सेवांची निर्मिती होत असते हे पाहून माझे ऊर अभिमानाने भरून आले. 'दीन असावे पण लीन असू नये' या उक्तीची प्रचिती येथे आल्यावाचून राहिली नाही.

गेल्या दोन दशकांमध्ये भीषण महागाई, अनियमित पाऊस आणि विलंबित शासकीय अनुदान यामुळे आनंदवनाच्या स्वावलंबनाची झेप ही अपुरी ठरू लागली आहे, तरी आनंदवनात आनंद ओसंडून वाहत आहे. आनंदवन पूर्वीइतकेच आनंदी आहे. आनंदाची उणीव येथे भासतच नाही. प्रत्येकाच्या चेहेऱ्यावर आनंदच दिसत होता. आनंदवनाला अनेक संस्थांच्या, अनेक परदेशी नागरिकांच्या सातत्याने भेटी असतात, पण आनंदवनातील कर्मचारी कधी त्रासलेले, ग्रासलेले दिसत नाहीत तेवढ्याच जोमाने, आनंदाने, ते सर्वांचे स्वागत/आदरातिथ्य करतात. आनंदवनातील शेती व पूरक व्यवसाय उदा. सुतारकाम मेटल फॅब्रिकेशन, हातमाग, यंत्रमाग, छापखाना, हस्तकला, चर्मकला हे विभाग पाहिले व तेथे कार्यरत असलेले हसतमुख कर्मचारीही पाहिले अन् क्षणभर त्यांच्याशी स्वतःची तुलना करून पाहिली, तर जमीन-अस्मानाचा फरक मला जाणवला. महारोगी सेवासमिती वरोरा यांनी खरोखरच महारोग्यांना स्वतःचे दुःख विसरून आनंदाचे डोही सोडले आहे आणि म्हणूनच ते 'श्रम ही श्रीराम हमारा' या मंत्रानुसार आपले जीवन अत्यानंदाने जगत आहेत.

मला आनंदवनात खरा आनंद झाला तो तेथील सर्व कुष्ठरुग्णांना आनंदात वावरताना, पाहताना व आलेल्या पाहुण्यांना आनंदवनाची माहिती अभिमानाने सांगताना! केवढा आत्मविश्वास, केवढी जिद्द त्यांच्या ठायी पाहायला मिळाली. आपल्याला महारोग झाला ह्या भितीनेच माणूस पार खचून जातो; परंतु येथे वेगळेच चित्र पहायला मिळाले. भितीवर प्रीतीची जीत व्हावी असेच पाहायला मिळाले.

आनंदवनामध्ये मला खूप काही शिकायला मिळाले. पार्किन्सन्स या आजारामध्ये आपणही खचून जाता कामा नये. हा पहिला धडा मी गिरवला. कुष्ठरुग्णांप्रमाणे ठामपणे आजारावर मात करण्याची प्रेरणा मला आनंदवनात मिळाली. शरीराचे काही भाग (अवयव) नष्ट होऊनसुद्धा कुष्ठ रुग्ण ताठ मानेने जीवन जगू शकतात. अनेक प्रकारची कामे अगदी सहजपणे करू शकतात, मग आपले तर सर्व अवयव अजून शाबूत आहेत मग आपण तर इतरांकरिता अधिक जोमाने जीवन जगले पाहिजे, समाजाकरिता काहीतरी केले पाहिजे हा वसा येथे मला मिळाला.

आनंदवनाचा कानाकोपरा मी अगदी डोळसपणे पाहिला. मला तेथे प्रचंड स्वच्छता बघायला मिळाली. नीटनेटकेपणा व शिस्त पहायला मिळाली. स्वच्छता, रोगांना दूर ठेवते किंवा जेथे स्वच्छता तेथे देवता ही सुवचने मी फक्त शालेय जीवनात फळ्यावर लिहिलेली वाचली होती; परंतु त्या वाक्यांची प्रचिती मला आनंदवनात पहायला मिळाली. एवढी प्रचंड स्वच्छता पाहून मला फार अचंबा वाटला आणि तीव्रतेने जाणवले की, आपण आपली छोटीशी हौसिंग सोसायटी व तिचा परिसरसुद्धा इतका स्वच्छ ठेऊ शकत नाही मग याला जीवन म्हणायचे का?

आनंदवनामध्ये पुनर्वसनांची संख्या जवळपास २५०० पेक्षा अधिक आहे तरीसुद्धा या आनंदवनात भांडणे, हेवेदावे यांचा मागमूसही नाही. सर्व लोकांमध्ये ऐक्याची भावना दिसून आली. प्रेम, जिव्हाळा, सहकार्य, आपुलकी ह्यांची एकमेकांवर जणू ते सातत्याने उधळणच करताना दिसतात. सगळीकडे नुसता आनंदी-आनंद.

आनंदवनाची मुहूर्तमेढ बाबा आमटे व त्यांच्या सहधर्मचारिणी साधनाताई यांनी १९४९ मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा गावाजवळच्या पडीक माळरानात रोवली आणि खरोखरी सर्वांनी मिळून त्या मातीचं सोनं केलं. हे आनंदवनातील अनेक छोटे-मोठे उपक्रम पाहता पदोपदी जाणवले. कोणतीही संस्था उभी करणं व तिचे कामकाज सतत अविरतपणे ६२/६३ वर्षे करणं ही सोपी गोष्ट नाही ह्याची प्रचिती आनंदवनात गेल्यावरच येते. आनंदवनाची माहिती कानांनी ऐकणे व आनंदवन प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहणे याचा खूप आनंद वाटला.

आनंदवनातील सर्व बांधवांना अन्न, वस्त्र, निवारा व औषधोपचारादी सुविधा अखंड पुरविणाऱ्या आमटे कुटुंबीयांना व आनंदवनाला आर्थिक पाठबळ देणाऱ्या सर्व संस्थांना, हितचिंतकांना, दानशूर व्यक्तींना माझे त्रिवार अभिवादन!

●●●